Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 21 December 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: २१ डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

भारतानं मलेरियाची प्रकरणं आणि संबंधित मृत्यूदर कमी करण्यात लक्षणीय प्रगती केली असल्याचं जागतिक आरोग्य संघटनेच्या २०२४ च्या जागतिक मलेरिया अहवालात नमुद करण्यात आलं आहे. दुर्गम भागात मलेरिया प्रभावीपणे कमी करण्यासाठी काम करणाऱ्या भारतातील सामुदायिक आरोग्य कर्मचाऱ्यांचं, विशेषत: महिलांचं जागतिक आरोग्य संघटनेनं कौतूक केलं आहे. या अहवालानुसार, देशभरात मलेरियामुळे होणाऱ्या मृत्यूदरात ६८ टक्क्यांनी लक्षणीय घट झाली आहे.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेनं मणप्पूरम् फायनान्स कंपनीला २० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. ग्राहकांच्या माहितीच्या काही विशिष्ट तरतूदींमध्ये तफावत आढळून आल्यामुळं दंडाची कारवाई करण्यात आली. गेल्या वर्षी मार्च महिन्यात मणप्पूरम् फायनान्सची तपासणी केल्यानंतर रिझर्व्ह बँकेकडून कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात आली होती. कंपनीनं काही विशिष्ट ग्राहकांना एकापेक्षा जास्त ओळख क्रमांक दिले होते तसंच त्यांच्या पॅन क्रमांकाची पडताळणी झालेली नव्हती, असं आरबीआयनं सांगितलं आहे.

****

काँग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेत सहभागी विविध संघटना राज्याच्या आणि लोकशाहीच्या विरोधात काम करणाऱ्या होत्या, असा आरोप मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेदरम्यान केला आहे. त्या संघटनांची आणि त्यांच्या प्रमुखांची यादी द्यावी, असे आव्हान प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र लिहून दिले आहे.

****

पीडीत महिलेच्या तक्रारीकडं दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांवर, राज्य महिला आयोगाकडून कारवाई केली जाईल, असा इशारा महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी काल दिला. कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जनसुनावणी कार्यक्रमात त्या बोलत होत्या. त्या सध्या राज्यव्यापी दौऱ्यावर असून काल कोल्हापूरात जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांनी महिलांविषयक तक्रारींची स्थानिक अधिकाऱ्यांसोबत जनसुनावणी घेतली, यावेळी त्यांनी सर्व तक्रारींची व्यक्तीशः दखल घेत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना या तक्रारींचं निवारण करून पीडीत महिलेला न्याय देण्याचे आदेश दिले. दरम्यान, आयोगापुढं तक्रारी मांडण्यासाठी महिलांनी गर्दी केली होती. यावेळी प्रभारी जिल्हाधिकाऱ्यासंह, पोलिस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिका उपायुक्त यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

***

“प्रशासन गांव की ओर” या मोहीमेच्या पहिल्याच दिवशी काल नागरिकांच्या साडे दहा लाखांवर तक्रारींचं निवारण करण्यात आलं. नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी थेट त्यांच्या गावात जाऊन सेवा देण्यासाठी ‘प्रशासन गांव की ओर’ ही पाच दिवसांची मोहीम काल सुरू करण्यात आली. याअंतर्गत तालुका आणि पंचायत मुख्यालयांच्या ठिकाणी १८ हजारांपेक्षा जास्त शिबिरं आयोजित करण्यात आल्याची माहिती कार्मिक, नागरिक तक्रार आणि निवृत्तीवेतन मंत्रालयानं दिली.

***

वेगवेगळ्या गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या आणि शासनानं बक्षीस जाहीर केलेल्या दोन जहाल नक्षलवाद्यांनी काल गडचिरोली पोलिस आणि केंद्रीय राखीव दलापुढे आत्मसमर्पण केलं. रामसू पोयाम आणि रमेश कुंजाम अशी आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांची नावं आहेत. रामसू पोयामावर चकमक, खुन, दरोडा आदी संबंधित १२ गुन्हे दाखल असून त्याच्यावर शासनानं सहा लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं. रमेश कुंजाम २०१९ पासून नक्षली कारवायात सहभागी असून त्याच्यावरही शासनानं दोन लाख रुपयांचं बक्षीस ठेवलं होतं. आत्मसमर्पण योजना सुरु झाल्यापासून आतापर्यंत ६८० नक्षलवाद्यांनी पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं आहे.

****

लातूर इथं दोन दिवसीय लघु चित्रपट महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. २३ आणि २४ डिसेंबर रोजी होणाऱ्या या स्पर्धात्मक महोत्सवात लघुचित्रपट, माहितीपट,

ॲनिमेशन आणि व्हिडिओ गीतं आदी प्रकारांचा समावेश आहे. अभिजात फिल्म सोसायटी आणि दयानंद शिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा महोत्सव सर्वांसाठी नि:शुल्क आहे.

****

रेल्वे मार्गाच्या कामामुळे धर्माबाद–मनमाड मराठवाडा एक्सप्रेस उद्या २२, २३, २६, २७, २९ आणि ३० डिसेंबरला धर्माबाद ते नांदेड दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. तर काही गाड्या उशीरानं धावणार आहेत. दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क कार्यालयानं ही माहिती दिली.

****

१९ वर्षाखालील महिलांच्या टी–ट्वेंटी आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघानं अंतिम फेरीत धडक मारली आहे. काल झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात भारतानं श्रीलंकेचा चार खेळाडू राखून पराभव केला. मलेशियात क्वालालांपूर इथं उद्या होणाऱ्या अंतिम सामन्यात भारताची बांगलादेश संघासोबत लढत होणार आहे.

****

राज्यात थंडीचा जोर कायम असून मालेगाव इथं आज सर्वात कमी १२ पुर्णांक चार अंश सेल्सियस इतकं तापमान नोंदवलं गेलं. त्यानंतर अहिल्यानगर इथं १२ पुर्णांक सात, जालना इथं १३ पुर्णांक पाच, परभणी इथं १६ पुर्णांक एक आणि नांदेड इथं १७ पुर्णांक दोन इतक्या तापमानाची नोंद झाल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

****